I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 405-411
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# नव्वदोत्तरी कालखंडातील लेखिकांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीवाद

उज्वला नामदेव जानवे
डॉ.आंबेडकर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,चंद्रपूर

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :-**

नव्वदोत्तरी कालखंडात लेखन करणाऱ्या गौरी देशपांडे,तारा वनारसे,रोहिणी कुळकर्णी, अंबिका सरकार, शांता गोखले, सानिया, कविता महाजन, मेघना पेठे, शिल्पा कांबळे या जवळपास सर्वच लेखिकांच्या कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी 'स्त्री' असल्याचे दिसते.स्त्री प्रश्नांची अचूक जाण असणाऱ्या सकस, स्त्रीकेंद्री आशयबिजाच्या या कादंबऱ्यातून स्त्रीजीवन, कुटूंबजीवन आणि स्त्रीपुरूषसंबंध यांचे अनोखे दर्शन घडते. शिक्षणाने आत्मभान जागृत झालेल्या स्त्रीचा जीवनसंघर्ष, पारंपरिक आणि आधुनिक जीवनपध्दतीतून निर्माण होणारे पेच त्यांच्या कादंबऱ्यांच्या मुळाशी आहे. पारंपरिक स्त्रीप्रतिमांचा विध्वंस करीत 'बाई'पणा नाकारत स्त्रीच्या 'माणूस'पणासाठीचा हा लढा आहे. या लेखिकांच्या कादंबऱ्यांतून पारंपरिक चौकटीत न बसणाऱ्या,जाचक पुरूषी सत्ता नाकारणाऱ्या, सामाजिक संकेत झुगारणाऱ्या, लिंगभावाधिष्ठित विषमता नाकारणाऱ्या, आपल्या लैंगिक अनुभवाची संयमित अभिव्यक्ती करणाऱ्या, स्त्रीपुरूष निखळ मैत्रभाव जपणाऱ्या, व्यक्तिवाद व स्वातंत्र्य ही मूल्ये प्रमाण मानणाऱ्या अशा सशक्त, स्वतंत्र विचारांच्या आणि आत्मनिर्भर नायिका समोर येतात. नव्वदोत्तरी कालखंडातील या कादबंऱ्यांतून कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पातळ्यांवर स्त्रीजीवनात होणारा प्रचंड बदल अधोरेखित होतो. स्त्रीचे प्रश्न, तिच्या जाणीवा, उच्चवर्गीय स्त्रियांचे जग, विवाहित स्त्रिच्या व्यथा, अर्थार्जन करणाऱ्या व करियरला प्राधान्य देणाऱ्या स्त्रियांच्या समस्या, दुर्गम भागातील आदिवासी पाडयातील स्त्रियांचे जग इथपासून ते समलिंगी संबंध व एड्सग्रस्त स्त्रियांच्या जगातील वास्तव दाहकता या लेखिका सहज चितारतात. स्त्रीशोषणाला कारणीभूत ठरणाऱ्या लग्नसंस्था व कुटुंबसंस्थेला नकार देत पुरूषाविना एकटीच्या हिंमतीवर बांधलेले, फक्त एकटीचे घर ही नविन संकल्पनाही कादंबऱ्यांतून पुढे येते. आधुनिकतेच्या आणि जागतिकीकरणाच्या नावाखाली बोकाळलेल्या चंगळवादाचेही दर्शन या नव्वदोत्तरी कादंबऱ्यांतून होते.

**बीजसंज्ञा :-** स्त्रीवाद, पुरूषप्रधानता, लिंगभावाधिष्ठित विषमता, स्त्रीपुरूषसमानता, व्यक्तिवाद, मैत्रभाव.

---

## प्रस्तावना :-

मराठी साहित्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण प्रवाह म्हणजे स्त्रीवादी साहित्य. पाश्चात्य देशात जन्मलेल्या या स्त्रीवादी विचारधारेने आपल्याकडे आंतरराष्ट्रीय महिला दशकानंतर चांगलेच बाळसे धरले. १९९० मध्ये भारतात लागू झालेल्या खुल्या आर्थिक धोरणातून जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली आणि त्याच्या प्रभावात भारतीय स्त्री सर्वांगाने बदलली. स्वतंत्र 'माणूस' म्हणून स्वत:ची ओळख सिद्ध करण्यास हे वातावरण तिला पोषक ठरले. मानवी नातेसंबंधाची गुंतागुंत, शिक्षण-रोजगाराच्या संधीने बाह्यजगाशी आलेला संबंध नि विचारासोबतच राहणीमानात झालेला बदल, त्यातून वाढलेला चंगळवादाचा प्रभाव, मुक्त लैंगिक संबंधाची ओढ नि त्यातून निर्माण झालेले प्रश्न, वैवाहिक संबंधाचा बदलता ढाचा, योनिशुचितेच्या बदलत्या कल्पना, लिव्हइन रिलेशन, पर्यायी कुंटुंबाची नवकल्पना, स्त्रीपुरूषांच्या एकमेकांप्रती बदललेल्या अपेक्षा, स्त्रीपुरुष मैत्रभाव, प्रगल्भ राजकीय विचारधारा, जुनी व नवी मूल्ये

यातील संघर्ष यासर्व बदलत्या समकालीन वास्तवाचे पडसाद नव्वदोत्तरी स्त्रीवादी कादंबरीत उमटायला लागले. विभावरी शिरूरकरांपासून ते आजच्या शिल्पा कांबळे पर्यंतच्या स्त्रीकादंबरीकारांनी पुरुषसत्ताक समाजातील स्त्रीवर्तनाच्या आदर्शवत अपेक्षांना, बेगडी स्त्रीप्रतिमांना लाथाडत स्त्रीचं जगणं-भोगणं आपल्या कादंबऱ्यांतून वास्तवपणे चितारले. अशाच नव्वदोत्तरी कालखंडातील स्त्रीवादी दृष्टिकोनातून महत्त्वाच्या ठरणाऱ्या काही निवडक लेखिकांच्या निवडक कादंबऱ्यांचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात करावयाचा आहे.

**शांता गोखले:-**

स्त्रीच्या स्वतंत्र अस्मितेचा आणि मुक्तीचा बंडरूपीझेंडा रोवणारी शांता गोखले यांची 'रीटा वेलिणकर' (१९९०) ही कादंबरी भारतीय स्त्रीजीवनाचे निराळे संवेदन मांडते. चौकटीबाहेरच्या जीवनाच्या हव्यासापोटी बेरंग झालेल्या 'रीटा'ची ही कहाणी जागतिकीकरणाच्या नावाखाली स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या यातनांकडे, तिच्या समाजनिर्मित शोषणव्यवस्थेकडे लक्ष वेधते. सुशिक्षित होऊन आर्थिक स्वावलंबन अनुभवणाऱ्या एका अविवाहित स्त्रीच्या जगण्याची धडपड,पारंपरिक समाजाच्या चौकटीत राहून 'स्व' ची जाणीव झालेल्या नव्या आत्मभान जागृत स्त्रीची सहवेदना, कुटुंब, समाज आणि नोकरीच्या ठिकाणीस्त्रीचे होणारे शोषण,स्त्रीपुरूष संबंधातील ताणतणाव,मुक्त लैंगिक संबंध ही कादंबरी अचूक मांडते. आर्थिक स्वातंत्र्यामुळेनको असलेल्या विवाहबंधनात अडकून न पडता; आपल्या आयुष्यातील पुरुषांना वगळून स्त्रिया पुरूषांशिवायही स्वतंत्रपणे जगू शकतात ही 'स्व' ची जाणीव या कादंबरीच्या नायिका रीटा, सरस्वती, संगीता यांच्या ठिकाणी दिसते. त्यातूनच स्त्रीने आपल्या हिंमतीवर पुरूषाविना केलेल्या फक्त एकट्या स्त्रीचे घर ही नवकल्पना कादंबरीतून पुढे येते.

आपलं नातं तुझ्या कुटुंबाला सांगून माझ्याबरोबर मोकळेपणानं, समाजाला न जुमानता प्रेमाच्या नात्याने जगायला तयार आहेस का? असे म्हणत विवाहबाह्य संबंधाकडे लक्ष वेधत

विवाहसंस्थेविरुद्ध बंड पुकारते. "रीटा म्हणते- "यू बास्टर्ड! माझ्यावर प्रेम केलंस. त्याला तू भानगड म्हणतोस ? गुन्हा झाला तो. तुला सगळं गुपचूप करायचं होतं. मीतर माझ्या आई-वडिलांना, साऱ्या जगाला ओरडून सांगितल असतं; तुझ्याशी मी बिनलग्नाचा संबंध ठेवायला तयार आहे, पण तुझ्यात कुठं आहेती हिम्मत ? मला गटारातल्या उंदरासारखं राहायला भाग पाडलंस.अजूनही तुला गटारातच मिटल्या डोळ्यांनी 'मजा' मारायचीआहे." (पृ.४५) रीटाचा हा त्रागा आहे म्हणूनच त्यात विसंगतीआहे." (नव्वदोत्तर मराठी साहित्य, पृ.९४)असे डॉ. मदन कुलकर्णी यांना वाटत

असले तरी रीटानेस्वसन्मानार्थ पुकारलेला तो लढा आहे.

**अंबिका सरकार:-**

आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असणे महत्वाचे मानणाऱ्या नायिका अंबिका सरकार यांच्या 'एका श्वासाचे अंतर" (१९९०)आणि 'अंतना आरंभही' (२००८) या कादंबऱ्यांतून उभ्याराहते. एक 'माणूस' म्हणून स्वत:ची ओळख सिद्ध करण्यासधडपडणाऱ्या नायिकेच्या रूपातून शिक्षण, आर्थिक स्वावलंबन,निर्णयस्वातंत्र्य, घटस्फोट, पुनर्विवाह या प्रक्रियेतून जातांनास्त्रीच्या भावविश्वात घडून आलेला प्रचंड बदल अधोरेखित होतो.नायिका उषा मनासारखा जोडीदार मिळावा म्हणून घरातून पळून जाऊन लग्नकरते. आर्थिक स्वावलंबी होते. वेळ येताच नवऱ्याच्या घरातून बाहेरही पडते. पण मुलगी निर्भया मात्रतिच्यापेक्षाही एक पाऊल पुढेटाकते. विवाहसंस्था नाकारतलग्नन करता आवडत्या पुरुषाबरोबर एकत्र राहण्याची तयारीठेवते. लग्नाशिवायचे सहजीवन, स्वत:चे हक्काचे घर हवे असणे,मूलनको असणे, प्रियकराच्या दुसऱ्या लग्नातही आडकाठीनकरता त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा सन्मान करणे. अशाझालेल्या स्थित्यंतरातून, सामाजिक दडपणातून मुक्तझालेल्याची प्रतिनिधी म्हणून नायिकाउभ्या राहतात.

**गौरी देशपांडे:-**

व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्वभानजागृती हालेखनाचा गाभा असणाऱ्या प्रखर व्यक्तिवादी, आधुनिक विचारानेउठून दिसणाऱ्या 'गौरी देशपांडे' यांच्या 'मुक्काम' (१९९२), 'गोफ'(१९९९) व 'उत्खनन' (२००२) या कादंबऱ्यातून सर्वार्थनि स्वतंत्र,मुक्त, प्रगल्भ स्त्रीची रूपे येतात. गौरी विशेषत: उच्चमध्यमवर्गीयाचे जग चितारते. स्वानुभवाचा परिसस्पर्श असल्याने याव्यक्तिरेखा अधिक जिवंत होतात. प्रचलित संकेतनिष्ठसमाजव्यवस्था ठोकरून स्त्रीवरील अन्यायाला कारणीभूत ठरणाऱ्या बंधाना झुगारण्याची ताकद त्यांच्या नायिकात आहे. शरीरसंबंधाबाबत वाटणारा संकोच, योनीशुचितेचे माजलेले अवडंबर, विवाह-मातृत्व-कुटुंब, प्रेम याविषयीच्या गोंडस, तकलादू कल्पनांना गौरीच्याकादंबऱ्यात थारा नाही. म्हणूनच 'उत्खनन' ची नायिका 'मणी'लालग्नन करता नुसता संसार थाटायचा आहे. "कशाला लग्नकरायचं? मला मुलंबाळं नकोत, लौकिकाला काय जो धक्काबसेल, त्यानं माझं काही वाकडं होणार नाहीये, पैशासाठी मीजब्बारवर अवलंबून नाही; मग हे उपचारच करण्यात काय अर्थआहे ? विशेषत: ते मान्य नसताना ? " (उत्खनन, पृ. २३)स्त्रीशोषणाला कारणीभूत ठरणाऱ्या विवाहसंस्थेकडे बघण्याचानायिकांचा दृष्टिकोन असा पारंपरिकतेपेक्षा वेगळा आहे. गौरीच्या एकंदर कादंबऱ्यातून व्यक्तिस्वातंत्र्य,

स्त्रीपुरुषसमानता,निखळ पुरुषमैत्रभाव, दोन मैत्रिणीचे भावबंध, आईपणाच्यापारंपरिक प्रतिमेला छेद देणारे आई–मुलांचे नाते, सावत्रबाप व मुलीचे भावबंध, रेडिमेट कुंटुंबाची कल्पना, रक्ताच्यानात्यापेक्षा मित्रमैत्रिणीपासून बनलेले पर्यायी कुटुंब, मुक्तलैंगिक संबंध, विवाहन करता आवडत्या पुरुषासोबतचेसहजीवन, दुसऱ्या लग्नानंतर निर्माण होणारे प्रश्न, पतीपत्नीचेचाळीसीनंतरचे नाते, एकटीचे हक्काचे घरया सर्वांचे प्रभावी चित्रण येते.

**आशा बगे:–**

संसार, कुटुंब, करियर निनोकरी यांच्या विळख्यात अडकलेल्या नव्वदोत्तरी काल खंडातील स्त्रीच्या मन:स्थितीचे प्रातिनिधिक चित्रण आशा बगे यांच्या 'त्रिदल' (१९९४),'सेतू'(२०००), 'भूमी' (२००४), 'भूमिका आणि उत्सव' (२०११) या कादंबऱ्यांतून येते. काळाच्या ओघात एकत्र कुटूंब पध्दतीचा झालेला लोप, नोकरी अर्थार्जनाने स्त्रियांना आलेला आत्मविश्वास, स्वत:चे निर्णय स्वत: घेण्याची आकांक्षा, अर्थार्जनाच्या उपलब्धअनके संधी नि त्यातून निर्माण झालेले प्रश्न, कामानिमित्तानेपरदेशगमन करावे लागल्याने अपत्यसंगोपनाचा ऐरणीवर आलेलाप्रश्न कादंबरीतून अधोरेखित होतो. मुलांसाठीच आईचे सर्वस्वया आईपणाच्या आदर्शवत, प्रेमळ, सात्विक, वात्सल्यसिंधू स्त्रीप्रतिमेला नायिका छेद देतात. व्यक्तिस्वातंत्र्याला अधिकमहत्व देणाऱ्या, करियरच्या विळख्यात सापडलेल्या, उच्चशिक्षणाचीभूक असणाऱ्या आणि त्यासाठी कुटुंबाला डावलून परदेशात जाणाऱ्या त्यांच्या नायिका आपले ठसठशीत वेगळेपण जपतात.

**सानिया:–**

आत्मभान जागृत झालेल्या आधुनिक स्त्रीचीसंवेदनशीलता आणि प्रस्थापित मूल्यांचा संघर्ष या द्वंद्वातूनउभ्या राहिलेल्या सानियाच्या 'स्थलांतर' (१९९४), 'आवर्तन'(१९९६) व 'अवकाश' (२००१) या कादंबऱ्या. बुध्दिनिष्ठ वकणखर बाण्याची समर्थ स्त्री त्यांच्या कादंबऱ्यांतून चित्रितहोते. संसाराच्या नावाखाली सर्वस्व गमावण्याची पाळी येणे,त्यातून सुटण्यासाठी 'लिव्ह इन रिलेशनचा'नवा पर्यायआजमावून बघणे, प्रेम, स्वातंत्र्य, विचारपूर्वक स्वीकारलेलेमैत्रीपूर्व सहजीवन, सहजीवन संपल्यानंतर येणारा एकटेपणा,असुरक्षितता, सर्व नाती सांभाळतांना होणारी फरफट सानियाच्या कादंबरीतूनव्यक्त होते.

**कविता महाजन:–**

जाचक पुरुषी सत्ता नाकारत धाडसाने घराबाहेरव आपल्या संकुचित परिघाबाहेर पडत स्त्रियांनी घेतलेला'स्व' अस्तित्वाचा शोध म्हणजे कविता महाजन यांची 'ब्र' (२००५)ही कादंबरी. नायिका प्रफुल्लाचा एक सामान्य स्त्री ते पूर्णवेळकार्यकर्ती पर्यंतचा हा प्रवास. शीर्षकातूनच वेगळेपण जपणारी हीकादंबरी दुर्गम भागातील,

आदिवासी पाड्यातील स्त्रीजीवनातलेराजकीय, सामाजिक प्रश्न घेऊन त्याची प्रखर व वस्तूनिष्ठ मांडणी करते.

कविता महाजनयांची 'भिन्न'(२०१०)ही कादंबरी नावाप्रमाणेच भिन्न, वेगळी आहे. महानगरीय स्त्रियांचे बदलते आर्थिक जीवन, बदलत्या परिस्थितीत स्त्रीला कराव्या लागणाऱ्या तडजोडी, चंगळवादाचे वाढते आकर्षण, कामप्रेरणेच्या गरजेला लागलेले विकृत वळण, फसलेल्या स्त्रियांची पिळवणूक, एड्ससारख्या रोगामुळे स्त्रियांच्या आयुष्यात निर्माण झालेले भयावह प्रश्न, लेस्बियन मुलींचा प्रश्न, वेश्याव्यवसाय, हिजडे यांचे जिवंत विश्व भिन्न कंगोऱ्यासह कादंबरीतून उभे राहते. एड्सग्रस्त रचिता शिर्के, वडिलांचे नाव आणि आडनावही टाकून निव्वळ आईचे नाव लावणारी प्रतिक्षा कमल, मालकी हक्कावर विश्वास नसलेली लेनिना या कादंबरीतील प्रभावी स्त्री व्यक्तिरेखा. लग्न करून नवऱ्याची खातिरदारी व पोर पैदा करण्यात त्यांना स्वारस्य नाही. “तेचतर विचारतेय ना...कशासाठी ? म्हणजे समज 'घर ?'... तर ते आहेय की माझ्याकडे. त्यासाठी कुणाच्या आसऱ्याला जाण्याची गरज नाही. 'पैसा...?'– कमावतेय मी. 'सामाजिक प्रतिष्ठा ?'–ती काही केवळ लग्नावर अवलंबून असते असं मी मानत नाही. माझ्या कामातूनच माझी ओळख, माझी प्रतिष्ठा तयार होईल. ते पुरेसं आहे.'' (भिन्न, पृ. १४३) असे म्हणत आपल्या कृतीचे समर्थन करतात. लग्न, कुटुंब, घरच्या जबाबदारीहून समाजाच्या जबाबदाऱ्या त्यांना अधिक महत्त्वाच्या वाटतात. बदलत्या, आधुनिक परिप्रेक्ष्यात बाईला पुरुषाची सोबत असायलाच हवी असं या नायिकांना वाटत नाही.

**मेघना पेठे:–**

'लग्न' नावाच्या नाटकाचे दरदिवशीचे प्रयोग बंदव्हायला हवे असे वाटणारी 'मीरा' आणि प्रामाणिकपणाचेबक्षीस म्हणून दोनदा लग्न मोडलेली 'ती' यांची कर्मकथाम्हणजे मेघना पेठे यांची 'नातिचरामि' (२००५) ही कादंबरी.लग्न, घटस्फोट आणि घटस्फोटातून उद्‌भवणारे प्रश्न हात्यांच्या चिंतनाचा विषय. नायिका व्यक्तिस्वातंत्र्याच्या भोक्त्याआहेत. अर्धा चढलेला डोंगर उतरायचा खुळेपणा करूनये हेआजीचे वाक्य तिच्या डोक्यात लख्ख असलेतरी एक स्वतंत्रव्यक्ती, स्वतंत्र माणूस घडण्याच्या प्रक्रियेत हे चढणं तिला असह्यहोते. आयुष्यातला एकएक दिवस तिला तिच्या मनासारखाजगायचा आहे. त्यातून कळत नकळत ती पातिव्रत्याच्या, जुन्यास्त्रीप्रतिमांना जबर धक्का देते. दुसऱ्या पुरुषाबरोबर रत झाले,आणि नियम मोडले. 'मोडते आहे' असे सांगून मोडले हे स्पष्टसांगण्याइतका निधडेपणा तिच्याजवळ आहे. तडजोडीपेक्षा एकटंराहूनही स्वत:चे आयुष्य फुलवता येते, पुरूषाशिवायही स्त्रियांचेएक वेगळे जग आहे यावर तिचा गाढ विश्वास आहे. म्हणूनच

I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 405-411
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

प्रत्येकवेळी नवऱ्याच्या नाकारलेपणाचं दु:ख घेऊन जगण्यापेक्षा "आयुष्यभर मी सगळ्यांसारखं, सगळ्यांचं सगळं करतानामन मारत राहिले, नुसत्या तडजोडीच करत राहिले, पण मलामरतांना हुतात्मा होऊन नाही मरायचं. यापुढे एक दिवसजरी उरला असेल आयुष्यातला, तरी तो मला माझ्या मनासारखाजगूनच या जगाचा निरोप घ्यायचा आहे. मला माझेही थोडेलाड करायचे आहेत."(नातिचरामि, पृ. १२९-१३०) असे तिलास्वत:च्या पद्धतीने, स्वतंत्र, दिलखुलास जगायचे आहे. या जगण्यावर अगदी लांबूनसुध्दा कुणाची सावली तिला नको आहे. इथपर्यंतचा हा प्रवास आहे.

**शिल्पा कांबळे:-**

शिल्पा कांबळे यांच्या 'निळ्याडोळ्याची मुलगी' (२०१४) या कादंबरीतून झोपडपट्टी आणि झोपडपट्टीतील स्त्रीजीवनाच्या भयाणवास्तवाचे दर्शन घडते. आईने मरून जावे पण पळून जाऊनये असे वाटायला लावणाऱ्या या कादंबरीतून आईवडिलांच्याभांडणात लेकरांच्या भावनांना होणारा चुराडा व्यक्त होतो. नायिका 'उल्का' ही संयत आणि संयमी आहे. ज्या वातावरणात तिची जडणघडण झाली तो परिसर तिला पोषक नसतांनाही ही ती स्वत:ची एक वेगळी व्यक्तिमत्वघडण करते. कुटुंबाची कोणतीही राजकीय पार्श्वभूमी वा वारसा नसतांना 'आक्रोश' या संस्थेची अध्यक्ष होण्यापर्यंतचा तिचा हा प्रवास संघर्षमय आहे. जागतिकीकरणाने अर्थार्जनासाठी अनेक क्षेत्रे उपलब्धकरून दिले असले तरी त्यातून नवसमस्याही उद्भवल्याचे वास्तव कादंबरी मांडते. लैंगिक स्वातंत्र्य अनुभवणाऱ्या मीराचा अर्थातच बंधनावर, विवाहसंस्थेवर विश्वास नाही. "हो, विजय लवस् मी पण लग्न बिलकूल नाही. तो क्षत्रिय आहे कास्टने.त्याची आई परमिशन देणार नाही आणि मी. मॅरेजवर ट्रस्ट करत नाही. फेल असते ते." (निळ्या डोळ्यांची मुलगी, पृ. ६६) पैसा, धर्म, जात काहीही न बघता चरस घेतल्यासारखे तिने मनोज, समीर, टोनी, विजय यांच्यावर लग्नाची अपेक्षा न करता प्रेम केले. पुरूषांनी निव्वळ तिचा वापर केला. नवमूल्यांच्या आगमनाने स्त्रीचे आत्मभान जागृत झाले असले तरी सामाजिक जीवनातील सुरक्षितता कमी झाल्याने स्त्रीचे जीवन अस्थिर आणि असुरक्षित झाल्याचे दिसते.झोपडपट्टीतील जीवन, तृतीयपंथीयांचे जग, स्त्रीपुरूष शारीरिक संबंध, व्यसनाधीनता, आंतरजातीय विवाह अशा वास्तवावर कादंबरी प्रकाश टाकते.

नव्या जगातील स्त्रीच्या नव्या जीवनसंघर्षाचे दाहकत्व या कादंबरीतून आकार घेते.

याशिवायही रोहिणी कुळकर्णी यांची 'कृतार्थ', 'सातवं दालन', 'पिंपळफेरे', 'गर्भनाळ', 'स्वातीचा उ:शाप', निर्मला देशपांडे यांची 'टिकलीएवढं तळ', 'कथा एका बकुळीची',

तारा वनारसे यांची 'श्यामिनी', जाई निंबकर यांची 'साथ', शांता योगी यांची 'परकी', माधवी देसाई यांची 'हरवलेल्या वाटा', प्रिया तेंडूलकर यांची 'जन्मलेल्या प्रत्येकाला', अंजली सोमण यांची 'बंदिश', अरूणा सबाणे यांची 'विमुक्ता', 'मुन्नी', प्रतिमा इंगोले यांची 'बुढाई' या कादंबऱ्यांतूनही कमी जास्त प्रमाणात स्त्रीवादी जाणीवा व्यक्त होतात.

**समारोप:–**

नव्वदोत्तरी कालखंडातील शांता गोखले ते शिल्पा कांबळे पर्यंतच्या लेखिकांच्या कादंबऱ्यांचा स्त्रीवादी दृष्टीने विचार करता या लेखिकांनी स्त्रीचे जीवन, तिचे प्रश्न, पितृसत्ताक पुरूषप्रधान व्यवस्था आणि लिंगभावाधिष्ठित विषमता मांडत शतकानुशतके स्त्रीच्या होत असलेल्या शोषणाला वाचा फोडली. सांकेतिक स्त्रीप्रतिमांना ठोकरत तिच्या महत्‌स्थानासाठी आवाज उठविला.

**निष्कर्ष**

१) नव्वदोत्तरी कालखंडातील लेखिकांच्या कादंबऱ्यांच्या केंद्रस्थानी 'स्त्री' असून; तिच्या एकंदर व्यक्तित्वातून पारंपरिक स्त्रीप्रतिमा बदलत गेल्याचे दिसते.

२) लिंगभावाधिष्ठित विषमता मांडत पुरूषांप्रमाणेच स्त्रीची लैंगिक गरज ही सुध्दा नैसर्गिक व सहज भावना आहे, हे कादंबऱ्यातून स्पष्ट होते.

३) स्त्रीशोषणाला कारणीभूत ठरणाऱ्या विवाहसंस्थेला नाकारत 'लिव्ह इन रिलेशन' चा पर्याय शोधणाऱ्या नायिका आहेत.

४) कुटुंबसंस्थेला पर्याय शोधतांना मित्रमंडळींच्या एकत्र कुटुंबाची कल्पना तसेच पुरूषविरहित स्त्रीच्या स्वत:च्या हक्काच्या, एकटीच्या घराची संकल्पना कादंबरीतून पुढे येते.

५) स्त्री पुरूष समानता मानणाऱ्या, शिक्षण अर्थार्जनाच्या संधीमुळे 'स्वभान' जागृती होत 'माणूस' पणाकडे नायिकांचा झालेला हा प्रवास आहे.

**संदर्भ :–**

ढेरे अरूणा संपादीत १ (२०१३) (प्र.आ.) स्त्री – लिखित मराठी कादंबरी (१९५० ते २०१०), पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

संपादीत (२०१८) (प्र.आ.) नव्वदोत्तर मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर.

देशपांडे गौरी (२०१८) (पाचवी आवृत्ती) उत्खनन, मौज प्रकाशन, मुंबई.

महाजन कविता (२०१८) (सहावी आवृत्ती) भिन्न, राजहंस प्रकाशन, पुणे.

पेठे मेघना (२०२०) (नववी आवृत्ती) नातिचरामि, राजहंस प्रकाशन, पुणे.

कांबळे शिल्पा (२०१४) (प्र.आ.) निळ्या डोळ्यांची मुलगी, गोदा प्रकाशन, औरंगाबाद.

जानवे उज्वला (२०२१) समकालीन लेखिकांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीवाद An International Peer Reviewed & Refereed Journal,Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies April - June; 2021, Vol - 10, Issue – 55